RNI Reg. No : MAHMUL/2015/74000

ISSN : 2395 - 759X

# AKANKSHA..... New Directions & Challenges

# आकांक्षा..... नवी दिशा आणि आव्हाने

# आकांक्षा..... नई दिशा और आव्हाने

**Vol.VII, Issue IX, September 2021**

No part of this Journal may be reproduced in any form, by Photostar, Microfilm, Xerography, Of any other means, of incorporated into any information reteieval system, electronic or mechanical, without the written permission of the Author, Editior-In-Chief and the Publisher of this Journal.

Copyright © 2015 by. Prof. Mayur B. Lahane
Inc. All Rights Reserved

**Powered By**

**Editor-In- Chief**
**Mayur Lahane**

**Published By**

Akanksha Tankalekhan Mutipurpose Society.
Near Ram Mandir, Peth pura,
At. Post. Hiwarkhed
Tq. Telhara Dist. Akola Maharashtra 444103
Cont :- 9096593842

# Index

**Sr. No.** **Contents** **Page No.**


1. **Domestic Violence In India: Causes, Consequences And Remedies**
   - Dr. Manoj Nikalje 1- 14

2. **Sanitation Practice of Mishing Community : A Study of Gereki Mishing Village in Majuli District**
   - Dr. Devanand Ambhore 15-29

3. **Concentration of Rice Industrie in Kolhapur District**
   - Dr. Arun A. Patil 30-35

४. **टप्पा गायन शैली एक प्राचीन विधा**
   – डॉ. राजेश उमाळे ३६–४१

५. **त्रिपिटक साहित्यातील वाङ्मय मूल्यांचा चिकित्सक अभ्यास**
   – प्रा. डॉ. मुकेश भाऊराव सरदार ४२–४६

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VII, Issue IX, September 2021
ISSN 2393-759X

# ५. त्रिपिटक साहित्यातील वाङ्मय मूल्यांचा चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. मुकेश भाऊराव सरदार
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
चिखलदरा

## त्रिपिटक परिचय

त्रिपिटक म्हणजे तीन पिटके ! मात्र त्यामध्ये सुमारे ६० ते ६५ लहान मोठ्या ग्रंथांचा समावेश आहे. परंतु संपूर्ण त्रिपिटक म्हणजेही बुद्ध धम्माचे संपूर्ण ज्ञान नव्हे. बुद्ध धम्माचे ज्ञान महासागरासारखे अथांग असून, त्या धम्म महासागरातील ज्ञान त्रिपिटके जणू पखालीने उपसून काढीत आहेत, अशी त्रिपिटकामागील कल्पना आहे. त्रिपिटके काढून बुद्ध धम्माचे मुख्य समग्र सार ग्रंथित करण्यात आले आहे.

भ. सम्यक बुद्धा यांनी आपल्या मुखाने सांगितलेले धम्मज्ञान त्या वेळेच्या भिक्खूनी तोंड पाठ केले प्रामुख्याने आदरणीय महाथेरोकश्यप यांनी भगवान बुद्धाचे मुखोद्‌गत केलेले धम्मज्ञान जे सांगितलेले ते विनय पिटक म्हणून लिहिले गेले तर आदरणीय आनंद यांनी मुखोद्‌गत केलेले धम्मज्ञान जे सांगितले ते सुत्तपिटक व धम्मपिटक म्हणून लिहिले गेले. म्हणजे भगवान बुद्धांच्या महानिर्वाणानंतर त्रिपिटक लिहिले गेले आहे.

## त्रिपिटी साहित्य

बौद्ध धम्माचे मूळ तत्त्वज्ञान, विचार आणि मार्गदर्शक सूत्रे त्रिपिटक साहित्यात आहे. त्याला बुद्ध वचन असेही म्हणतात. या त्रिपिटक साहित्याच्या शुद्धिकरणासाठी सहावी धम्मसंगीती ब्रह्मदेशात इस सन १९५४ ते १९५६ या काळात भरविली. त्यात स्वीकारलेले त्रिपिटक हेच प्रमाणित मांडण्यात येते. हेच त्रिपिटक मुख्यतः तीन भागात विभागलेले आहे. १. विनयपिटक २. सुत्तपिटक ३. अभीधम्मपिटक

म्हणून त्यांना तिपिटक किंवा त्रिपिटक असे म्हणतात. विनयपिटक हा संघ सदस्यांनी पाळावयाच्या विनय नियमांचा ग्रंथ आहे. त्याचे महावग्ग चुल्लवग्ग, पाराजिकेंद्र पाचित्तिय आणि परिवार असे भाग आहेत.

**सुत्तपिटकाचे पाच निकाय किंवा खंड आहेत.**

(१ ) दिघनिकाय (तीन भाग) मज्झिम निकाय (तीन भाग) अंगुत्तर निकाय (चार भाग) संयुक्त निकाय (चार भाग) सुददक निकाय (पंधरा ग्रंथ) यात धम्मपद, सुददकपाठ, उदान, इतिवृत्तक धरिया पिटक सुत्तनिपात, थेरगाथा विमानवत्थु पेतवत्थु जातक, पेरिसभिदामग्न अपदान, बुदधवंस, निददेस या ग्रंथाचा समावेश होतो.

आधिम्मपिटक हा मुख्यता मनोविश्लेषणात्मक तत्वज्ञानाचा ग्रंथ असून यात एकूण सात ग्रंथ आहेत. ते १) धम्मसंगणी २) दिभंडग ३ ) धातुकथा ४ ) पुग्गलपतञ्चती ५) कथावत्थु ६) यमक ७) पठान हे होत.

अशाप्रकारे बौद्‌ध विचार आणि जीवन मार्ग समजून घेऊन इच्छिणारांनी त्रिपिटकाचा अभ्यास वरील ग्रंथाच्या आधारे करावा लागेल.

एकसारख्याच पातळीवरून धर्मोपदेश केला नाही

भगवान बुद्‌धांनी प्रत्येक उपासकाला सारख्याच पातळीवरून धर्मोपदेश केला नाही, ते श्रावकांची मानसिक, बौदि्धक अवस्था, योग्यता आणि त्याचे विद्यमान स्वरूप ओळखून त्यांना उपदेश देत असत. श्रावक गृहस्थ आहे की, गृहिणी आहे, व्यापारी आहे की, संन्यासी आहे. याचा विचार करून त्याची योग्यता ठरूनच ते धर्मोपदेश करीत. संन्यासाला अयोग्य असणाऱ्या माणसाला बुद्‌ध अप्रमादी जीवन जगायचीच प्रेरणा देत. विवाहिताला सद्‌गृहस्थ धर्माच्या पालनाची शिकवण देत कुमारींना विवाहोपरान्त पतिगृही करायच्या कर्तव्याची जाणीव देत, उपाशी माणसाला उद्‌देश देण्यापूर्वी त्याच्या भोजनाचे व्यवस्था होणे ते अत्यावश्यक मानीत अशा प्रकारे बुद्‌ध श्रावकांच्या योग्यतेचा विचार करूनच उपदेशा देत असत मॅज्झिम निकायात याचा उल्लेख आला आहे.

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VII, Issue IX, September 2021
ISSN 2395-759X

## पच्चिसमुप्पाद सुत्त :- ( प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत)

जगातील महान वैज्ञानिक, तत्ववेक्ता तसेच जीवनाचा मार्ग दाता म्हणून भगवान बुद्धांची ख्याती आहे. भगवान बुद्ध भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्यकाळ जाणणारे आहेत त्यांनी दुःखाच्या कारणांचा शोध लावून चार आर्य सत्य सांगितले. १) दुःख आहे २) दुःखाला कारण आहे हे दोन आर्यसत्य दुःख सांगणारे आहेत. तर ३) दुःखाचा निरोध करता येतो ४) दुःखाचा निरोध करण्यासाठी आर्य अष्टांगिक मार्ग सांगितला. हे दोन आर्य सत्य सुखाचा मार्ग दाखवणारे आहेत. त्याचबरोबर अविद्येला संपूर्णपणे हरविण्यासाठी प्रतित्व समुप्याद हा सिद्धांत सांगितला आहे.

भगवान बुद्ध म्हणतात भिक्खूंना प्रतित्यसमुत्पादाचा उपदेश करीन तो ऐका. चांगल्या प्रकारे मनात धारण करा. भिक्खूंनो, प्रतित्यमुत्पाद काय आहे. भिक्खूनो, अविद्या असल्याने संस्कार होत असतात संस्कार असल्याने विज्ञान होत असते. विज्ञान असल्याने नामरूप होत असते. नामरूप असल्याने षडायतन होत असते. (डोळे, कान, नाक, जिभ, शरीर आणि मन) षडायतन असल्याने स्पर्श होत असतो. स्पर्श असल्याने वेदना होत असते. वेदना असल्याने तृष्णा होत असते. तृष्णा असल्याने उपादान होत असते. (काम उपादान, मिथ्यादृष्टी. शीलव्रत, आत्मवाद) उपादान असल्याने भव होत असतो. भव असल्याने जन्म होत असतो. जाती असल्याने जरा, मरण, शोक, रडणे, ओरडणे, दुःख त्रस्त होणे आणि चिन्तित होणे होत असते. अशा प्रकारे सर्व दुःख समूहाचा सम-उदय होत असतो. भिक्खूंनो याला म्हणतात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत

म्हणून अविद्येला संपूर्णपणे हरविल्याने आणि नष्ट केल्याने संस्कार होत नसतात. संस्काराचा निरोध केल्याने विज्ञान होत नसते. विज्ञानाचा निरोध केल्याने नामरूप होत नसते. नामरूपाचा निरोध केल्याने षडायतन होत नसते. षडायतनाचा निरोध केल्याने स्पर्श होत नाही. स्पर्शाचा

निरोध केल्याने वेदना होत नसते. वेदनेचा निरोध केल्याने तृष्णा होत नाही. तृष्णेचा निरोध केल्याने उपादान होत नाही. उपादानाचा निरोध केल्याने भव होत नाही. भवाचा निरोध केल्याने जाती होत नाही. जातीचा निरोध केल्याने ना जरा, ना मरण, नाशोक, नारडणे, ओरडणे, ना दुःख करणे, ना त्रस्त होणे आणि ना चिंतित होत असते. अशा तऱ्हेने हा सर्व दुःख समुदायाचा निरोध होत असतो.

**निब्बाण प्राप्त करणे, (निर्वाण) हेच ध्येय मानवाचे असावे.**

शिलामध्ये प्रतिष्ठित होऊनच समाधी अवस्था प्राप्त होत असते. त्यातून मग प्रज्ञेच कमळ फुलते. जो प्रज्ञा प्राप्त करतो तो चार आर्य सत्याला जाणत असतो. अनित्य लक्षण, दुःख लक्षण आणि अनात्म लक्षण हे प्रज्ञेचे तीन लक्षणे असून याचा बोध प्रज्ञावंताला होत असतो. तथागतांकडून उपदेशलेल्या धम्म नियमानुसार शिलांचे शिक्षण ग्रहण करणे चित्ताचे (समाधीचे) शिक्षण ग्रहण करणे, प्रज्ञेचे शिक्षण ग्रहण करणे हेच शिक्षणामध्ये श्रेष्ठतम शिक्षण होय. या शिक्षणामुळे प्राण्यांची विशुद्धी होते. शोक परितापाचे उपशमन होते. दुःखाचा अस्त होतो. ज्ञानाची प्राप्ती होऊन निर्वाणाचा साक्षात्कार होतो. यालाच श्रेष्ठतम शिक्षण म्हटले जाते.

निर्वाण म्हणजे चित्ताची अशी अवस्था की, जे दुःखीही नाही ना सुखीही नाही. म्हणजे अविदयेचा निरोध करून प्रज्ञा प्राप्त करणे होय. जन्ममृत्यूचे चक हे आपल्या चित्तावरच अवलंबून असल्यामुळे सडायतनाच्या सहा नदया आपल्याला महासागरात जाण्यापासून थांबवाव्या लागतील. सुकवाव्या लागतील तरच निब्बाण प्राप्त होईल.

"पाहिले म्या मरण आपुल्या डोळा।
अनुपम जाहला तो सोहळा"

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VII, Issue IX, September 2021
ISSN : 2395-759X

माझा मरण सोहळा माझ्या डोळयाने पाहिल असे संत तुकाराम म्हणतात. अणूरेणू या तोकडा, तुका आकाशा ऐवढा ही अवस्था प्राप्त करणे म्हणजे निब्बाण होय.

**समारोपः**

भगवान बुद्धांचे संवाद म्हणजे त्यांच्या खुद मुखातील धम्मवाणी. भगवंताची वाणी प्रज्ञेन ओथोंबलेली उच्च आणि मधूर त्यांच्या धम्मवाणीने जगातील सर्व मानवांच्या हृदयात प्रवेश केला आहे. भगवान बुद्धावर व त्यांच्या धम्मावर जगातील अनेक पंडितांनी, शेकडो ग्रंथ लिहिलेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्ध व त्यांचा धम्म हा त्यातील सुवर्ण कळस होय. भगवान बुद्धांची मूळ निर्मळ धम्मवाणी प्रस्तृत होत होत जतन केली गेली. हे जगातील मानवांचे महत भाग्यच म्हटले पाहिजे परंतु भगवान बुद्धांच्या मुखातील शुद्ध व निर्मळ धम्मवाणीत काही दोष कालपरत्वे, देशपरत्वे, कळत न कळत घुसडले गेले हेही तितकेच दुर्दैव होय. अशा अडचणीतून बाहेर पडण्याचा तोडगा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितला तो तोडगा असा जे जे बुद्धीला पटणारे आहे शुद्ध मनाचे आहे ते ते भगवान बुद्धाचे आहे. असे मानावे आणि जे जे बुध्दीला न पटणारे व शुध्द मनाचे नसेल ते ते भ बुध्दाचे नव्हे म्हणून अव्हेरावयास हरकत नाही. हा तोडगा सदर शोध निबंध वाचनाच्या वेळी वाचकांनी वापरण्यास कसलीच हरकत नाही.

**संदर्भ ग्रंथ :**

१) त्रिपिटक, अनुवाद अॅड.बी.सी. कांबळे, सुगावा प्रकाशन पुणे पेज नं. ०३, ११७.

२) अंगुत्तर निकाय भाग १ पै.नं. ४ अनुवादक मा.श. मोरे, कौशल्य प्रकाशन हडको, औरंगाबाद.

३) मराठी संत साहित्यावर बोध्द धर्मांचा प्रभाव (पेज. ६६ ) लेखक- डॉ. भाऊ लोखंडे, सुगावा प्रकाशन पुणे.

४) सयुक्त निकाय: भाग २ निकाय वग्गो पेज १५,१६ अनुवादक मा.श मोरे कौशल्य प्रकाशन, हडको औरंगाबाद.

५) बुध्द धम्मावरील चार निबंध-३ समाधी मार्ग आचार्य धर्मानंद कोसंबी कौशल्य प्रकाशन हडको औरंगाबाद.

६) अभिधम्म पिटक भदन्त तिस्सवंस महास्थविर सुगत प्रकाशन नागपूर-१७.

(७) सुत्तपिटक भदन्त तिस्सवंस महास्थवीर सुगत प्रकाशन नागपूर-१७.

(८) विनयपिटक अनुवाद- राहुल सांकृत्यायन, त्रिपिटक प्रकाशन प्रतिष्ठान, दीक्षाभूमी संदेश नागपूर.